**स. फौ. खं. क्र.१००/२०२५**
**सरकार वि. चंद्रशेखर**
**नि.९ खाली**

सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | सुधाकर रामदास सोनवने |
| वय | – | ३९ वर्ष धंदा – मजूरी |
| पत्ता | – | सालवा, (येसंबा) ता. मौदा. |

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती रामटेके यांच्यातर्फे</u>**

१. दिनांक २२.०१.२०२५ रोजी पोलीसांनी मला बोलविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनाम्याची कार्यवाही केली नाही व काहीही जप्त केले नाही. आता मला समन्स दाखविला. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी माझी सही पानठेल्यावर उभा असताना घेतली होती. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **<u>निशाणी क्र.१०</u>** देण्यात येते. आता मला घटनास्थळ/जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **<u>निशाणी क्र.११</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २२.०१.२०२५ रोजी पोलीसांनी मला निलज खंडाळा येथे पंचनाम्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की त्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून १० देशी दारूच्या निपा जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की जप्त दारू पैकी एक बॉटल रासायनीक परिक्षणाकरीता वेगळी काढून सिल केली. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला, मला वाचून दाखविला व त्यानंतर

मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्याकरीता आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री नरवाडे यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2026.02.07 16:42:12 +0530

ठिकाण –कामठी (रा.र. शेरेकर)
दिनांक –०७.०२.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र.२, कामठी.